**सत्र खटला क्र.१४/२०२३**
**शासन वि. सुभाष व इतर**
**निशाणी क्रमांक ५९**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करते की,
माझे नावः– निकीता सुरेश कज्रेवाड

वयः– २२ वर्षे, व्यवसायः– खाजगी नोकरी

राहणार – वाघोली, जि. पुणे

**सरकार पक्षातर्फे सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री. पी.के.जाधव यांच्या मार्फतः–**

मृतक अरविंद नरसींग पिटले हे माझे वडील होते. आरोपी क्र.२ सुनीता अरविंद पिटले माझी आई आहे. आरोपी क्र.१ सुभाष शिंदेला मी ओळखते. त्यांनी माझ्या घरी मेसचा डब्बा लावला होता म्हणून ते माझ्या घरी येत होते. ते जागृती शुगर कारखान्यात नोकरी करत होते.

२. दिनांक ०८.१०.२०२२ रोजी मला आरोपी सुभाष शिंदे यांच्या मोबाईलवरुन माझ्या बाबांचा व्हीडीओ कॉल आला. माझे वडील आणि दोन्ही आरोपी त्यावेळी माझ्यासोबत व्हीडीओ कॉलवर बोलले. त्यावेळी ते तिघे राहायला लातूरमध्ये होते. त्यादिवशी सायंकाळी ०६.०० ते ७.०० च्या दरम्यान माझे त्यांच्यासोबत व्हीडीओ कॉलवर बोलणे झाले. दुस–या दिवशी सकाळी मला माझ्या आईचा फोन आला आणि तिने मला सांगीतले की, बाबा घरी आलेले नाहीत. माझ्या आईने मला पुढे असे सांगीतले की, माझे बाबा तिचे पैसे घेवून गेलेले आहेत आणि त्यांचा फोन लागत नाही. मी माझ्या बाबांना मोबाईलवर कॉल केला पण त्यांचा फोन लागला नाही. त्यानंतर मी, माझी काकू, माझे दोन काका आणि आजोबा यांना फोन

लावून माझ्या बाबांबद्दल विचारले पण त्यांनी मला सांगीतले की, माझे बाबा त्यांच्याकडे आलेले नाहीत. मी आरोपी सुभाष शिंदेलाही कॉल केला आणि बाबांबद्दल विचारले. सुभाष शिंदेने मला सांगीतले की, ते माझ्या बाबांचा ईकडे–तिकडे शोध घेत आहेत. दुस–या दिवशी मला माझ्या पतीने सांगीतले की, माझ्या बाबांचा अपघात झाला आहे आणि त्यांना थोडा मार लागला आहे आणि आपल्याला गावी जावे लागेल. मी गावाला येईपर्यंत माझ्या बाबांचा अंत्यविधी झालेला होता. दुस–या दिवशी मला असे समजले की, दोन्ही आरोपींनी मिळून माझ्या बाबांना मारले आहे. घटनेच्या अनुशंगाने पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. आरोपी सुभाष शिंदेला जर मी पाहिले तर मी त्याला ओळखू शकते.

<u>उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री.एस.एस.नळेगावकर विधीज्ञ यांच्यामार्फत</u>

३. सन २०१७ मध्ये माझे लग्न झाले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या एक महिन्यापूर्वी माझी आई पुण्याला माझ्याकडे आली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आई–वडील हे बालाजीवाडी येथे राहत होते. माझी आई जागृती साखर कारखान्यामध्ये नोकरी करायची. माझे वडील कधी–कधी कामावर जायचे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या चुलत्यांपासून बाबांच्या भावांपासून माझे आई–बाबा वेगळे राहायचे. माझी काकू ज्योती पिटले ही बालाजीवाडी येथेच राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५.१०.२०२२ रोजी मी माझी काकू ज्योतीला असे सांगीतले होते की, माझे आई–वडील हे पुणे येथील लोहगाव रस्त्यावर कामाला आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्यावेळेस तिचे आई–वडील लातूर येथे राहत होते आणि वडीलांच्या सांगण्यावरुन तसे तिने तिच्या काकू ज्योतीला तसे सांगायला सांगीतले

होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे बाबा कुठे आहेत याबद्दलची माहिती ते कुणाला सांगत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांवर लोकांचे भरपूर कर्ज झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते दारु पिवू लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांनी त्यांची शेती माझी आत्या विजयमाला व माझी चुलती सीमा यांच्या नावावर केली. माझ्या वडीलांच्या नावावर कोणतीही शेती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे सगळे भाऊ एका ठिकाणीच होते फक्त ते नोकरीनिमीत्त बाहेर होते.

४. दिनांक ०८.१०.२०२२ रोजी व्हीडीओ कॉल झाल्यानंतर माझे बाबा कुठे होते हे कोणाला माहित नव्हते. मला पोलीस स्टेशनमध्ये माझ्या आजोबांनी सांगीतले की, दोन्ही आरोपींनी मिळून माझ्या बाबांना मारले आहे. मला, माझ्या बहीणीला आणि आजोबा यांना एकाच दिवशी पोलीस स्टेशनमध्ये बोलावले होते.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
दि. ३०/०३/२०२६. (आर.बी.भागवत)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र.२,
लातूर